http://hub.ipustak.com/marathi-
-laghukatha-spardha/.

॥श्री॥

सौ. श्वेता सुनील कुलकर्णी
फ्लॅट नं.१०७, बी विंग, श्री स्वामी छाया सोसायटी,
सरस्वतीनगर, उत्तमनगर, पुणे-४११०२३.
मो.- ८४८३०२४५०८, [illegible]
९७३०५४७६५०

प्रती-
टीम, iPustak
A Sonic Octaves Ventures

आपण आयोजित केलेल्या कथास्पर्धेसाठी मी माझी 'परीघ' ही कथा आपणास पाठवत आहे ती कथा आपणास आवडेल व स्पर्धेत यशस्वी होईल अशी आशा आहे.

कळावे,
आपली विश्वासू,
श्वेता कुलकर्णी

परिघ .

मीराने फोन ठेवला आणि ती तशीच सुन्न बसून राहिलेली पाहून ऋषीने न राहवून विचारलेच,

"काय झालं? कोण होतं फोनवर ?"

"वीणा... मल्हारच्या बायकोचा... "

"ओह! इतक्या वर्षांनी? आता काय आहे?" ऋषी त्रासपणे पुटपुटला.

"मल्हारला... मल्हारला ब्रेन ट्यूमर झाला आहे." मीरा म्हणाली, " तो आयसीयू मध्ये ॲडमिट आहे."

"मग भेटायला जायचंय?" ऋषीने अस्वस्थ होत विचारले.

"मला ठाऊक आहे, तुला राग येणारच..."

"मीरा..." ऋषी तीव्रपणे म्हणाला, "का येऊ नये ?"

" पण तो आता खूप आजारी आहे... आणि प्रश्न तो नाहीये... प्रश्न सलीलचा आहे... वीणा सांगत होती की तो खूप डिस्टर्ब झाला आहे तर तू बोलशील का त्याच्याशी !" मीराने सांगितले.

"आता आठवण आली का आईची ?" ऋषीने खोचकपणे विचारले.

"ऋषी... प्लीज..." ती कळवळून म्हणाली. कितीही झालं तरी सलीलची आई होती... सलील तिच्या धाकटा मुलगा होता... मल्हारबरोबरचे नाते एका सहीसरशी संपले पण सलीलबरोबरचे नाही ना संपू शकत ? युगानुयुगे ते तसंच राहणार... आणि सलीलमुळे असलेले मल्हारशी नाते.. तेही थोडा काळ का होईना काळाच्या उदरात तसेच रहाणार होते.. मल्हार शेवटच्या घटका मोजतोय... माणुसकीच्या नात्याने तरी..

मीरा ह्या विचारासरशी दचकली...

माणुसकी... माणुसकी परक्या माणसाला दाखवतात, आपल्या माणसांना दाखवतात ती आपुलकी. मल्हार आपला माणूस होता... प्रेमाचा... तो इतका परका झाला... आता ऋषी आणि सरस्वती आपली... सरस्वतीही सलीलसारखीच आपल्या रक्तामांसाची, आपल्या पोटात रुजलेली... आपण उलटं बोलतोय का? सलीलदेखील सरस्वतीसारखाच आपल्या पोटचा गोळा... त्याला भेटायलाच हवं... त्याला नसेल कळलं तेव्हा.. पण आता समजत असेल ना?

"आई, माझा अभ्यास झालाय. मी झोपायला जातेय..." सरस्वती दरवाज्याच्या चौकटीत येऊन सांगत होती.

मीराचे हात तिच्या दिशेने झेपावले, तेव्हाच सरस्वतीच्या लक्षात आले, काहीतरी बिनसलेय... सरस्वती सातवीत असली तरी त्यामानाने ती जास्तच समजूतदार होती. ती मीराजवळ आली. मीराने तिला कुशीत घेतले, आणि पाझरणारे डोळे ती दुसऱ्या हाताने टिपू लागली.

"सरस्वती, दिवा बंद केलास ना हॉलमधला?" ऋषीने लॅपटॉपवर

काम करीत विचारले.

"हो..." ती डोळे चोळत म्हणाली. पण आई का रडते आहे ह्यामुळे ती गडबडलीही होती. काय झाले असेल ?

"मग झोपायला जा. मीरा, तिला जाऊदे. तिला खूप झोप आली आहे." ऋषीच्या आवाजातला धाकच इतका होता की सरस्वती चटकन निघून गेली. मीरानेच शेवटी न राहवून विचारले,

"का पाठवलंस तिला! बसली असती माझ्याजवळ दोन मिनीटे!"

"का? तू इथे अश्रू गाळते आहेस! तिला काऊकही नाही काय झालंय ते आणि काय सांगणार आहेस तू? तिला मल्हार, सलीलबद्दल माहितच नाहीये."

"तूच तर सांगायचं नाही म्हणालास..."

"अर्थात! कशाला उगीच नको ते प्रश्न?" ऋषीने लॅपटॉप बंद केला,

"तू का रडते आहेस ?"

मीरा काहीच बोलली नाही. ऋषीशी काय बोलणार? काय सांगणार?

"मल्हारसाठी? इतका जीव आहे अजून त्याच्यावर? त्या वीणासाठी त्याने तुला घटस्फोट दिला आणि तू त्याच्यासाठी रडते आहेस?"

"मल्हारसाठी नाही. सलीलसाठी..." मीरा म्हणाली शेवटी," त्याच्यासाठी"

"त्याने कधी तुझ्याशी संपर्क करायचा प्रयत्न केला? मान्य आहे तेव्हा तो खूप लहान होता, पण आता तो एकवीस वर्षांचा आहे. आता तर कळतं ना?"

"त्याला मल्हारने कधी कळूच दिलं नाही."

"गैरसमज आहे तुझा... सलील मुलगा होता म्हणून मल्हारने त्याचा ताबा सोडला नाही... आणि हो, सलीलची इच्छा असती तर चार-पाच वर्षांत तो तुला भेटू शकला असता.. एकाच शहरात तर आहेत."

"मुंबईत... केवढी मोठी..."

"कमाल आहे तुझी. तो क्लासला जातो, शाळेत जातो, मित्रांकडे, फिरायला सर्वत्र जातो, सोशल मिडिया आहे. त्याच्यासारख्या मास्टर्स डिग्री करणाऱ्या मुलाला हे अशक्य नाहीच. तो पहिलीत असल्यासारखं तू बोलते आहेस. ती वीणा... त्याची आई आहे आता.."

ऋषीने मीरावर फैरच झाडली.

"आणि आता झोप बघू शांत! उद्या ऑफिसला जायचंय ना?"

त्याने दिवा बंद केला, सरस्वतीच्या खोलीत जाऊन ती झोपली आहे ना ह्याची खात्री केली आणि मीराच्या बाजूला येऊन निजला.

मीरा मात्र अंधारात जुने धागे धुंडाळत होती.

—*—*—

"काय गं..." शार्मिन मीराला म्हणाली," लोकलमध्ये असल्यापासून

बघतेय तू अगदी उदास दिसते आहेस! काय झाले आहे?"

लंचअवरमध्ये शार्मिनने मीराला विचारलं. तिचा चेहरा फिका पडलाय हे कुणीही सांगू शकलं असतं. शार्मिन तर तिची जीवाभावाची मैत्रिण. मीरा इथे नोकरी करू लागली तेव्हापासून शार्मिनही तिथे होती. योगायोगाने तिचे घरही मृषीच्याच घराजवळ होते. पण मल्हारशी घटस्फोट घेण्याआधीपासून दोघींची मैत्री. त्यामुळे मीराला तिचा, तिला मीराचा आधार वाटत असे.

"चल, आपण दोघी गणराजमध्ये डबा खाऊ." सगळ्यांबरोबर डबा खाताना शार्मिनला काहीच सांगता येणार नाही म्हणून मीरा म्हणाली.

"अगं, पण मला फार वेळ नाही बसता येणार. सरांनी महत्वाचे काम दिले आहे लगेच करायचे आहे. आपण ऑफिस सुटल्यावर चहासाठी थांबू तिथे."

शार्मिन म्हणाली.

"बरं." मीराने नाईलाजाने संमती दिली, "पण लवकर हं."

"हो, मला माहिती आहे, तुझ्या नवऱ्याला फार उशीर चालत नाही." शार्मिन म्हणाली, "आणि माझ्या सासूलाही.." डबाही त्यांनी झटपट संपवला.

दोघी आपापल्या कामाला लागल्या.

"हं आता बोल." शार्मिनने घाईघाईने म्हटले. तितक्यात तिथे वेटर आलाच. त्याच्याकडे बघत तिने पटकन म्हटले, "दो वडा सांबार और चाय." वेटर ओळखीचाच झाला होता कारण ऑफिसमधले सगळेचजण तिथे सारखे येत. तो मान हलवून निघून गेला.

"मल्हार आय सी यू मध्ये आहे." मीरा कसेबसे म्हणाली.

"काय सांगते आहेस?" शार्मिनचा विश्वास बसेना, "काय झालं आहे?"

"ब्रेन ट्यूमर..."

"ओह.. तुला कसं समजलं?"

"फोन केला होता वीणाने..." मीरा म्हणाली, "तिने सांगितले."

"का? आता कशाची गरज आहे? पैशाची!" शार्मिनने वैतागून विचारले.

"शार्मिन, तुला माहित आहे. मल्हारकडे भरपूर पैसा आहे, त्याने भरपूर पगारावर नोकरी केली कायम, झालंच तर मेडिक्लेम वगैरे बाबतीत तो जागरूक आहे. तरीपण तू..."

"मग? दुसरं कारणच काय?"

"सलील!" मीरा दुखावली गेली. शार्मिनला सलील आठवू नये!

"ओह! बरोबर! तू सलीलला भेटलीस तर मल्हारला कळणार नाही... म्हणून!" शार्मिन म्हणाली तशी मीरा वैतागलीच, "तू काहीही तर्क लावते आहेस.."

"तूच सांग.."

"सलील मल्हारच्या अवस्थेमुळे खचला आहे. त्याला भेट म्हणून.. म्हणजे मी त्याला भेटावे असे तिने सुचवले आहे."

"तू काय ठरवलं आहेस? अर्थात तू भेटणारच म्हणा.. पण ऋषी? ते काय म्हणाले? ते... त्यांना आवडले नसेल..."

"हो नं! तो म्हणतो सलीलने तुला कधी का भेटण्याचा प्रयत्न केला नाही?" मीराने खरे काय ते सांगून टाकले.

"हे बघ, त्याला सुचले नसेल, घाबरला असेल, कदाचित तुझ्याबद्दल गैरसमज झाला असेल.. काहीही कारण असू शकते! एकदा भेटून बघ. म्हणजे नाही म्हणण्याचा प्रश्नच नाही. प्रश्न आहे तो सरस्वतीचा.. तिला काहीच सांगू नकोस..."

मीराने वड्याचा घास तोंडात टाकत तिच्याकडे बघत होती. सरस्वतीचा विषय निघताच तिच्या घशात घास अडकला. सरस्वतीचंच टेन्शन आहे.

"तोच मोठा प्रश्न आहे माझ्यापुढे. तिला तर काहीच माहिती नाही."

"नाही ना? मग झालं तर?" शर्मिनने विषयच संपवला, "तू सलीलला भेटायचं की नाही, काय करायचं तुला पाहिजे ते तू करू शकतेस. फक्त ऋषीला मॅनेज कर. त्यांना काय सांगायचं काय नाही ते बघ.."

"हं..." मीरा उद्गारली.

दोघीही निघून बाहेर पडल्या. शर्मिन आणि ती स्टेशनवर आल्या. लोकलही लगेच मिळाली. शर्मिन नंतर तिच्या मार्गाने गेल्यावर मीरा मात्र तिथेच असलेल्या बाकावर बसली... झाडाखाली असलेला बाक रिकामाच होता. आजूबाजूच्या बाकांवर माणसं होती. जोडपी, मित्र कुणी मैत्रिणी... तो फूटपाथ छान डेव्हलप केला होता. सुंदर बाक, स्ट्रीटलॅम्प, आणि बाजूने झाडं... एरवी तिला इथे प्रसन्न वाटायचं आता मात्र ती हिरमुसली होती. ऋषीच्या भीतीने आपण सरस्वतीला काही सांगत नाही.. पण आज ना उद्या तिला सांगायला लागणारच. सांगायला हवं. किती दिवस लपवून ठेवणार? सलीललाही भेटायला हवं.. तो लहान आहे. तो मला वागला म्हणून मीही असं वागणं चूक आहे... कितीही झालं तरी... असो. आपली आई असं वागली असती तर? अजूनही आईचा आधार वाटतो. तिनेच ऋषीशी लग्न करायला लावलं. एक मल्हारवरचा त्याचा राग.. किंवा मत्सर सोडला, त्याचा हुकुमशाही स्वभाव सोडला तर बाकी ठीक आहे. नाहीतर आपण असं एकटं जगू शकलो असतो त्यांच्या संसारात? नाहीच. ऋषींचंही बरोबर आहे... बायकोचा पहिला नवरा कुणाला आवडेल? तोही असा... दुसऱ्या स्त्रीबरोबर अफेयर केलेला...

सगळंच क्लिष्ट झालंय.

अंधार गच्च होऊ लागला तशी ती उठली. थकवा आला होता. मगाशी खाल्ल्यामुळे पोट शांत होतं. सरस्वतीच्या ओढीने ती पावलं टाकू लागली.

—०—×—×—

"आई तू ?" सलील पलंगावरून उठून उभा राहिला. चेहऱ्यावर संमिश्र भाव. आनंदाचे, रागाचे... हेडफोन काढून ठेवत तो कसनुसा हसला.

मीरा खोलीच्या दारातून थेट त्याच्यासमोर येऊन उभी राहिली.

"नशीब मला ओळखलंस!" मीरा पटकन बोलून गेली. खरंतर तिच्यातली दुखावलेली आई बोलली होती.

"असं का म्हणतेस?" तो म्हणाला, "उलट.. उलट.. मलाच तुला भेटावंसं वाटत होतं पण धाडस झालं नाही."

तो गप्प झाला.

मीराने त्याच्याकडे निरखून पाहिलं, बराचसा तिच्यासारखा दिसत होता. तिला आतून खूप छान वाटलं... आपला मुलगा... लांबरुंद हाडापेराचा, उंच, सणसणीत... दुसऱ्या कोणातरी मुलीला, कुटुंबाला आधार देऊ शकणारा पुरुष... सरस्वतीविषयी वेगळी भावना असायची... नाजूक, कोमल, दुसऱ्या वंशाला वाढवू शकणारी... अशी.. किती निरनिराळ्या भावना, पण तितक्याच उत्कट, आईपणाला धन्य करणाऱ्या...

वीणा आलीच. हातात पाण्याचा तांब्या.

"मुद्दामहून आत बसा म्हटलं, कुणी ना कुणी येत जातं. तुम्हा दोघांना मोकळेपणी बोलता येणार नाही.." मग तिने सलीलच्या खांद्यावर हात ठेवला, "बोल रे... आणि हो, तू जेवायला थांब. जेवूनच जा दवाखान्यात. गोरे काका आहेत आत्ता तिथे. तुम्ही पण जेवूनच जा हं.."

मीरा त्या दोघांकडे पहात होती.. त्या दोघांना पाहून त्यांच्यामधले बाँडिंग सहजच कळून येत होते. सलीलला तिने अगदी प्रेमाने वाढवले असणार... का? कसे काय? बरंच आहे म्हणा.

"तुमचं ऑफिस?" वीणाने विचारले.

"मी आज गेले नाही ऑफिसला..." ऋचीला समजायला नको म्हणून मुद्दामहून..., "तू?"

"सध्या रजेवरच आहे."

वीणामध्ये फारसा फरक पडला नव्हता. उगाच दोनचार चंदेरी बटा... पण अधिकच स्मार्ट... मल्हार कसा असेल कुणास ठाऊक? का सोडले त्याने हिच्यासाठी आपल्याला! ह्या घरात पाऊल ठेवताना चटका बसला.. तीच पायरी चढताना.. घर पण अजूनच देखणं.

"कसं झालं मल्हारला हे?"

"काय सांगणार? कधी काय होईल?" वीणा म्हणाली, "तो इंग्लंडला जाऊन आला, पंधरा दिवसांनी डोकं दुखतंय सारखं म्हणायला लागला. सोनोग्राफीत कळलं.." वीणा सांगत होती, "तरी काळजी घ्यायचा सारखा तब्येतीची..."

"सलील, काय करतो सध्या?"
"एम.सी.ए." तो म्हणाला, "मग एम.बी.ए. करायचं आहे."
"छान!" ती म्हणाली, "शिक.."
"तुम्ही कशा आहात?"
"मी ठीक!" मीराने बोलताबोलता सलीलचा हात हातात घेतला आणि कुरवाळू लागली. ते पाहून वीणा समंजसपणे तिथून उठून गेली. सलीलच्या डोळ्यातून अश्रू आले, मग मात्र मीराचाही बांध फुटला. तो भर ओसरल्यावर दोघे सावरले.
"भेटत जा अधूनमधून..."
"नक्की..." तो म्हणाला, "बाबांचं असं झाल्यावर रक्ताचं नातं काय असतं ते कळलं.. म्हणून तुला भेटायची इच्छा होती. मला ठाऊक नव्हतं आईने तुला फोन केलाय ते!"
वीणाला पण तो आई म्हणतो तर!
"तू.. तू.. रागवली असशील किंवा कसं मला.." सलील चाचरत म्हणाला, "मला तुला कसं भेटावं कळत नव्हतं.."
"फोन आहे... सगळे मार्ग आहेत.."
"भीती वाटत होती."
"का?"
"तुझ्या घरी कसं आहे? तुला आवडेल का वगैरे!"
तिने त्याच्या गालावरून हात फिरवला. त्याला खूप गरज आहे आपली.
"वीणा?"
"माझी दुसरी, तितकीच प्रेमळ आई.." तो सहजपणे म्हणाला.
तिचा चेहरा सैलावला.. आपल्या मुलाला जीव लावणारी...
"सलील, चला जेवायला..." वीणाने हाक मारली, "परत दवाखान्यात जायला उशीर नको व्हायला."
डायनिंग टेबलवर सर्व व्यवस्थित मांडून ठेवलेलं... सलीलच्याच आवडीचं होतं म्हणे.
"तुम्ही जाणार दवाखान्यात?"
"नको. आज नको..." मीरा घाईघाईने म्हणाली. सलीलला भेटल्यावर परत मल्हारला ह्या अवस्थेत बघणे तिला शक्य नव्हते.
सलील गेल्यावर वीणाने मीराची ओटी भरली.
दोघीही अवघडलेल्या मनःस्थितीत होत्या.
"खरं म्हणजे मी हे उपचार पाळतेच असं नाही पण.." तिच्या त्या थांबण्यात खूप अर्थ भरलेले होते. मल्हार अत्यवस्थ असताना त्याच्या आधीच्या बायकोला कुंकू लावून ओटी भरायचं म्हणजे..

"नसतं केलं तरी चाललं असतं."
"मल्हार म्हणाला, तुम्हाला रितीरिवाज पाळायला आवडतं."
"पण अशावेळी..." मीरा थांबली, "तू काय करणार पुढे.."
"हेच.. नोकरी वगैरे.. मल्हारला काही होणार नाही असे वाटतेय मनात. सलीलचं पुढचं माहित नाही. म्हणजे तो काय ठरवतो ते." ती म्हणाली, "म्हणजे इथे रहातो की कुठे, परदेशात? त्याच्यावरच सगळं.."
"सलीलाशिवाय अजून कोणी?"
"नाही.. म्हणजे तसं ठरवलंच होतं."
मीराला धक्काच बसला, "का?"
"मनापासून वाटलं आणि आवडला तो. जेमतेम पाच वर्षांचा तर होता."
"तरीही आपलं..."
"आपलं मानलं की सालं.." वीणा सहज म्हणाली.
मीराला त्या वाक्यात कळून चुकलं मल्हारला वीणा का आवडली, आपण मात्र सलीलला एकदाही भेटलो नाही. तिला भेटल्यापासून भेटल्यासारखे झाले. ऋषीचा बाऊ करीत राहिलो. काय करेल तो फारफार तर?
"निघू मी?"
"येत जा हं."
मीराने तिचा निरोप घेतला पण भरलेल्या मनानं बाहेर पडली.

—*—*—*—

"कसा दिसतोय मल्हार? एकदम खंगलेला... बघवत नाहीये. पण डॉक्टर म्हणतात आशा आहे. तसंच व्हावं." मीराच्या मनात आलं.
सलील बाजूलाच उभा होता.
"निघूया?" त्याने विचारले.
"हो." ती जडपणे म्हणाली.
खरोखरंच पाऊल निघत नव्हते. मल्हारबरोबर सातआठ वर्षे संसार केलाच होता ना! धडाडीचा, पुढे पुढे जाण्याची रग असलेला... अगदी यशाच्या शेवटच्या पायरीपर्यंत तो त्याच उत्साहाने राबायचा... शिवाय भरपूर हुशार.
ऋषीही थोडा तसा. पण खूप अहंकारी, जुन्या वळणाचा. मल्हारशी संसार केल्यानंतर ऋषीशी जुळवून घेताना किती त्रास झाला. पण इलाजच नव्हता.
"चल.."
दोघेही बाहेर आले. थंडगार वातावरण होतं. आणि शांत..
वीणाचा फोन येऊन गेल्यापासून किती घडामोडी... वाटलंही नव्हतं.
"सलील.. सगळं कसं होऊन बसलंय. मला वाटलंही नव्हतं माझं आयुष्य

असेल! मला तू छोटुला होता तेव्हा वाटलंही नव्हतं मला तुला सोडून जायला लागेल... आई पण म्हणाली, तुझं पुढचं तुला माहित नाही, कशाला सलीलची फरपट... आणि खूप काही गमावलं."

"मलाही वाढायचं तूच मला सोडून दिलंस..."

"नाही रे. मल्हार तुला सोडायला तयारच नव्हता, वीणालाही..." मीरा म्हणाली, "चल कॉफी घेऊया."

दोघंही हॉस्पिटलच्या कॅफेटेरियात आले.

मीराला खूपच थकल्यासारखं वाटत होतं... (इतके) सगळं चाललंय आणि घरात ठाऊकही नाहीये..

"आई, पण मला वीणाआईने खरंच खूप छान सांभाळलं... कधी तुझी उणीव भासू दिली नाही." मग तिच्याकडे पाहून म्हणाला, "पण म्हणून तुझं महत्व कमी होत नाही. मी कायम तुलाही जपेन, तिलाही..."

मीरानं त्याला समजून घेत म्हटलं, "मीही तुला सोडून कशी राहिले कुणास ठाऊक? सरस्वती आल्यानंतर कुठे मी थोडी जगायला शिकले."

"मला तिला भेटायचं आहे..."

"सलील..."

"काय हरकत आहे? मी इथे एकटा. ती एकटी. तिला जर माझी गरज भासली, मला तिची तर? ते सोड.. आम्ही एकमेकांचे बहिण भाऊ आहोत हे तू विसरू नकोस. आम्ही भेटायलाच हवं. मी तर भेटणारच."

मीरालाही ते पटत होतंच.

"आता, तिची शाळा सुटेल तासाभरानं.. जाऊया?"

"हो!" सलील उत्साहानं म्हणाला. तो उत्साह त्या वातावरणाला शोभणारा नव्हता. आणि त्यात वडील इतके आजारी असताना.. पण कारणंच तशी घडत होती.

कॉफी घेऊन दोघंही सरस्वतीच्या शाळेपाशी आले.

थोडावेळ वाट पाहिल्यानंतर मुलींच्या घोळक्यात सरस्वती दिसली. मीराने घाईघाईने तिला गाठले. तिच्या मैत्रिणींना निरोप देऊन ती तिला सलीलजवळ घेऊन आली.

सरस्वतीच्या डोळ्यात अनेक प्रश्नचिन्ह! मीराला ते लक्षात आलेच.

"आई, आपण रेस्टॉरंटमध्ये बसूया."

आणि आई म्हणताच सरस्वती दचकली.

तिघेही तिथल्या चांगल्या रेस्टॉरंटमध्ये गेली.

"तुला काय आवडते?" सलीलने विचारले.

"अं!"

"तिला मसालाडोसा आवडतो." मीरानेच उत्तर दिले. त्याचक्षणी तिला

तिला लक्षात आलं, सलीलच्या आवडीनिवडी माहितीच नाहीत.

सलील सरस्वतीला काहीबाही प्रश्न विचारत होता कितवीत जातेस, काय आवडतं वगैरे... सरस्वती पुरती गोंधळली होती.

"सरस्वती हा तुझा दादा..." मीरा म्हणाली, "तुझ्या बाबांशी लग्न व्हायच्या आधी माझं एक लग्न झालं होतं... तू आता मोठी आहेस. सातवीत... तेव्हाचा हा माझा मुलगा सलील..."

"मग तू बाबांशी का लग्न केलंस?" सरस्वती रडवेली झाली होती.

"ते आई नंतर सांगेल.. मी आवडलो का तुला दादा म्हणून? तुला काही अडचण असेल तर ह्या दादाला फोन करायचा.." मग सलील तिच्याशी भरभरून बोलत राहिला. तिचा गोंधळ संपेपर्यंत..

मीरा कौतुकाने दोघांकडे पहात होती.

सलील अचानक म्हणाला, " मी हिला वीणाआईला भेटवणार.."

"ऑं?"

"हो. तिलाही आवडेल ही."

मीराने हसून प्रतिसाद दिला.

मग तिला वाटलं, सलीललाही घरी न्यावं, ऋषीला भेटवावं...

काय हरकत आहे? ऋषीही हळूहळू होईल शांत...

काय हरकत आहे?

तिला आता खूप शांत वाटत होतं.. थकवा गळून पडला होता.. नाती दुखावणारी असतात तशी सुखावणारीही असतात हे कळलं त्याला. फक्त मनाचा परिघ मोठा करायला हवा, मग आपल्या नातेसंबंधांचा, परिचितांचा, आयुष्याचाही परिघ वाढत जातो.

- सौ. श्वेता सुनील कुलकर्णी.